## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१६ ( प्रतिनिधी) :- राज्यशासनाने घेतलेल्या निर्णयानुसार दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाची सांगता विद्यापीठात दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सामुहिक वाचन कार्यक्रमाने झाली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम गेल्या १५ दिवसांपासून विविध कार्यक्रम घेवून राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत आज सामुहिक वाचनाचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. योगेश पाटील, प्रा. के.एफ. पवार, डॉ. सचिन नांद्रे, प्रा. आशुतोष पाटील, एस.आर. गोहिल, प्रा. नवीन दंदी, सुरेखा पाटील, ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक विजय आहेर व इतर शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१६ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे नोकरी व व्यवसाय करून शिक्षणाची संधी समाजातील सर्व घटकांसाठी या विभागाद्वारे संधी उपलब्ध करून दिली जाते. दि. १५ जानेवारी २०२५ पासून भारतीय आणि विदेशी भाषा जसे जर्मन, जपानी, जर्मन भाषा ए१ आणि ए२ स्तर, संस्कृत, मोडिलीपी या शिक्षणक्रमांसोबत सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या आणि मोजमाप, लिंग संवेदनशीलता, ज्येष्ठ नागरिक सहाय्यता दूत, कवयित्री बहिणाबाई : जीवन व काव्य, तथागत भगवानबुध्द आणि त्यांचे तत्वज्ञान आदी शिक्षणक्रमांची ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. त्याकरीता https://nmu.ac.in/exeternal-education/en-us/Programmes/Certificate-Program या लिंकवर अथवा संपर्कक्रमांक 0257-2257495/2258496 येथे संपर्क साधावा असे आवाहन विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी केले आहे.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा, अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे दि. १५ ते २७ जानेवारी या दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रमांना प्रारंभ झाला आहे.

दि. १५ जानेवारी रोजी दैनिक लोकमतचे निवासी संपादक किरण अग्रवाल यांचे व्याख्यान झाले. यावेळी त्यांच्या हस्ते भित्ती पत्रकाचे विमोचन झाले. प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु.पगारे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलतांना किरण अग्रवाल यांनी मातृभाषा जगविण्याची भूमिका प्रत्येकाने बजावली पाहिजे असे आवाहन केले. मराठी भाषेचे कोरडे उसासे टाकून भाषेचे संवर्धन होणार नाही तर दैनंदिन संवाद मराठी भाषेत व्हावा. समाज माध्यमांमध्ये संदेश पाठविण्यासाठी मराठी भाषेचा वापर केला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा. पगारे यांनी ज्ञान समृध्द होण्यासाठी रोज वाचन करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेत्रा उपाध्ये यांनी केले. स्नेहा गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी संतांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या भित्ती पत्रिकेचे वाचन तेजस्वीनी सुर्वे, प्रज्ञा गायकवाड, भाग्यश्री साळी, अर्जून पावरा, चेतना शिंदे यांनी केले.

**बातमी क्र. ४**

जळगाव दि.१५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखा प्रशाळे अंतर्गत असलेल्या योगशास्त्र विभागाच्या वतीने उद्या शुक्रवार दि. १७ जानेवारी रोजी आहार तज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे विद्यापीठात व्याख्यान होणार आहे. दुपारी ३.०० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात डॉ. दीक्षित हे 'चांगल्या आणि सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने' या विषयावर बोलणार आहेत. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील अशी माहिती योगशास्त्र विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी दिली.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ — दि १६ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि जळगाव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठात झालेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात ४६ विद्यार्थ्यांची अंतिम तर ३९५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली.

विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात झालेल्या या रोजगार मेळाव्यात ३६ कंपन्या सहभागी झालया होत्या त्यामध्ये जळगाव, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी येथील कंपन्यांचा समावेश होता. या मेळाव्यासाठी ९०० तरूणांनी नोंदणी केली होती. काही विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदासाठी मुलाखतीची संधी असल्यामुळे एकूण १२७४ विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्यात. या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यातून ४६ विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली. ३९५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड झाली आहे.

या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन खा. स्मिताताई वाघ यांच्या हस्ते करण्यात आले . अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, सहायक संचालक व सहायक केंद्रीय ॲप्रेंटिशिप सल्लागार श्री. एन.सी. गांगडे, व्य.प. सदस्य ॲड अमोल पाटील, डॉ. पवित्रा पाटील, सिनेट सदस्य प्रा. विशाल पराते, नितीन ठाकूर, स्वप्नाली काळे, अमोल मराठे तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संदीप गायकवाड, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, कौशल्य अधिकारी वृषाली भडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना खासदार स्मिताताई वाघ म्हणाल्या की, तरूणांना रोजगार मिळावा यासाठी केंद्र आणि राज्य सरकार पुढाकार घेत आहे. या प्रयत्नात विद्यापीठ सहभागी झाल्यामुळे आनंद झाला. जिद्द, मेहनत आणि कष्ट करण्याची तयारी ठेवली तर नोकरी अथवा व्यवसायात यश मिळते. शरीराला आणि मनाला कष्ट आणि मेहनतीची सवय लावून घेण्याचे आवाहन खा. वाघ यांनी केले. अध्यक्षीय समारोपात कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी समजासाठी जबाबदार नागरीक, देशासाठी संवेदनशील नागरीक आणि रोजगारक्षम विद्यार्थी तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठावर आहे. या भागातील विद्यार्थी प्रामाणिक आणि परीश्रम करणारे आहेत मात्र संवाद कौशल्यात तो कमी पडतो. त्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेवून प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले असल्याचे प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले. निखील गांगडे यांनी या मेळाव्यातून नोकरी प्राप्त झाली नाही तरी निराश न होता एनएटीएस च्या पोर्टलवर नोंदणी करावी. शासनाकडून विविध योजना राबबिल्या जात आहेत अशी माहिती दिली. प्रास्ताविकात संदीप गायकवाड यांनी कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राकडून सुरु असलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. एका छताखाली कंपन्या आणि विद्यार्थी यांना आणण्याचे काम या मेळाव्यातून साध्य झाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ. रमेश सरदार यांनी आभार मानले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रा. रमेश सरदार, डॉ. उज्ज्वल पाटील, सोनाली दायमा यांच्यासह विविध प्रशाळांमधील समन्वयक आदींनी परीश्रम घेतले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि १६ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी